# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३६२ - २३** **दिनांक : - १७/१०/२०२३**

## नायझेरीयन परदेशी नागरीकाचा खुन करुन ४ वर्ष फरार असलेल्या आरोपीला अटक गुन्हे शाखा- कक्ष २, वसई यांची कामगीरी.

तुळींज पोलीस ठाणे अकस्मात मृत्य रजि नं २२१/२०१९ सी आर पी सी १७४ प्रमाणेच्या चौकशी अधिकारी महीला पोलीस उप निरीक्षक/श्रीमती संध्या पवार यांनी अकस्मात मृत्युचे चौकशी करुन चौकशीअंती सरकारतर्फे फिर्याद दिल्यावरुन तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ११९७/२०१९ भादविस कलम ३०२, ३४ प्रमाणे या गुन्हयातील मयत जोसेफ उर्फ चिन्डीनिजु अमएची विल्सन(देश - नायझेरीया)वय ३५ वर्ष रा. हायटेंशनरोड, प्रगतीनगर, नालासोपारा पुर्व यास दिनांक १६/१०/२०१९ रोजी ०२.४५ वाजता पुर्वी नुर अपार्टमेंटच्या खाली रोडवर, प्रगतीनगर, नालासोपारा पुर्व येथे गुन्हयातील आरोपीत यांनी आपसात संगनमत करुन अंमलीपदार्थाच्या नशेवरुन तिक्ष्ण हत्याराने मारहाण करुन जिवे ठार मारल्याबाबत दिनांक २४/१०/२०१९ रोजी १०.४५ वाजता सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील तपासिक अधिकारी यांनी नमुद गुन्हयाचा तपास करुन तपासात १) नसीरखान वलीमहोम्मद खान २) आशिष उर्फ विक्की रोजेश मिश्रा ३) अमित अमर सिंह ४) कांचा रा. नालासोपारा पुर्व पुर्ण नाव पत्ता माहीत नाही अशा ४ आरोपीतांची नावे निष्पन करुन त्यापैकी नसीरखान वलीमहोम्मद खान या आरोपीतास गुन्हयात अटक करुन त्यांचे विरोधात मा. वसई न्यायालयात दोषारोप सादर केले होते. गुन्हयातील पाहीजे आरोपीत हे सापडुन न आल्याने त्यांना गुन्हयात अटक करता आले नव्हते.

मिरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील विविध गंभीर गुन्हयांतील पाहीजे व फरार निष्पन्न परंतु नजेराआड असणारे आरोपीत यांचा शोध घेवून अटक करण्याबाबत वरीष्ठांनी सुचना व मार्गदर्शन केले होते. त्याप्रमाणे तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ११९७/२०१९ भादविस कलम ३०२, ३४ प्रमाणे या गुन्हयाचे झाले तपासाबाबत व गुन्हयात अटक करण्यात आलेल्या आरोपीतांची पोलीस ठाण्यातुन माहीती प्राप्त करण्यात आली. पाहीजे आरोपीताचा शोध घेण्याअनुषंगाने घटनेबाबत गुन्हयाचे घटनास्थळी जावून गुन्हे शाखेच्या गुन्हे प्रगटीकरणाचे कौशल्याचे आधारे गुप्त बातमीदाराकरवी माहीती प्राप्त केल्यानंतर सदर गुन्हयातील पाहीजे आरोपीत कांचा रा. नालासोपारा पुर्व याचे पुर्ण नाव रोशन बैचन मंडल उर्फ कांचा असे असल्याचे निष्पन्न करण्यात आले. सदर पाहीजे आरोपीताचे वास्तव्याबाबतची माहीती घेत असताना सदर आरोपीत हा गुन्हा घडले प्रकारानंतर ६ महीने बँगलोर, कर्नाटक येथे वास्तव्यास होता व त्यानंतर सध्या तो अश्पाक महोम्मद शेख हे खोटे नाव धारण करुन डॉनलेन परीसरात वास्तव्यास असल्याची माहीती प्राप्त करण्यात आली. नमुद आरोपीताचा कसोशिने आजूबाजुचे परीसरात शोध घेवून गुप्त बातमीदाराकडुन ओळख पटवुन त्यास सापळा रचुन ताब्यात घेण्यात आले. त्याचेकडे नमुद गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता सदर आरोपीताचा ४ वर्षापुर्वी घडलेल्या सदरच्या गुन्हामध्ये सहभाग निष्पन्न झाला आहे.

**अटक करण्यात आलेल्या पाहीजे आरोपीताचे नाव :-** रोशन बैचन मंडल उर्फ कांचा वय २८ वर्ष रा. जय भारत बिल्डींग रुम नं १०५, डॉन लेन, आचोळे रोड, नालासोपारा पुर्व, ता. वसई

सदरची कामगिरी मा.श्री अविनाश अंबुरे पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, सागर शिंदे, स.फौ. संजय नवले, पो.हवा. चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर सर्व नेम- गुन्हे शाखा-२ वसई,

----0000----